## <u>प्रेस नोट</u>

**<u>परीमंडळ ३ पुणे शहर विभागातील दत्तवाडी पोलीस ठाण्याचे हद्दीतील सराईत गुन्हेगारास पुणे शहर पोलीस आयुक्तालय परिक्षेत्रातून एक वर्षासाठी हद्दपार केलेबाबत</u>**

दिनांक ०५/०३/२०१९

दत्तवाडी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील सराईत गुन्हेगार इसम नामे आदिनाथ सोपान साठे वय-२४ रा. गल्ली नं. २३ जनता वसाहत, पर्वती पायथा, पुणे यास मुंबई पोलीस कायदा कलम ५६ (१) (अ) (ब) प्रमाणे पोलीस उप आयुक्त परीमंडळ ३, पुणे शहर यांचेकडील तडीपार आदेश क्रमांक ०७/२०१९ दिनांक ०५/०३/२०१९ रोजी (१) एक वर्षा करीता पुणे शहर व पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय व पुणे जिल्हा परिक्षेत्रातून हद्दपार करण्यात आले आहे. सदर इसम त्याच्या गुंड साथीदारांसह स्वतः जवळ घातक शस्त्र बाळगून खुनाचा प्रयत्न करणे, मारामारी करणे, दरोडयाचा प्रयत्न वगैरे गंभीर गुन्हे करत आहे. त्याचे विरुध्द वारजे दत्तवाडी पोलीस ठाणेस वरील प्रमाणे गुन्हे दाखल असून त्याची सदर भागात दहशत असल्याने त्यास श्री. मंगेश शिंदे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ३, पुणे शहर यांनी पुणे शहर पोलीस आयुक्तालय व पुणे जिल्हा परिक्षेत्रातून एक (१) वर्षा करीता तडीपार केले आहे.

नागरीकांना तडीपार इसम दिसून आल्यास नजीकच्या पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा.

**( मंगेश शिंदे )**
पोलीस उप आयुक्त
परिमंडळ ३, पुणे शहर